31 MAY 2018
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘वालचंद’च्या गुणवत्तेचा संरक्षण क्षेत्रात उपयोग करून घेऊ - सुभाष भामरे

प्रतिनिधी, सांगली


**अभियंता क्षेत्रामध्ये** जागतिक स्तरावर नाव असलेल्या वालचंद महाविद्यालयातील गुणवत्तेचा संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेसाठी उपयोग करून घेण्यात येईल, असे संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे यांनी बुधवारी सांगलीत सांगितले.

वालचंद महाविद्यालयाचा पदवीदान समारंभ बुधवारी महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडला. या वेळी खासदार संजय पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, वालचंदच्या प्रशासकीय समितीचे अध्यक्ष अजित गुलाबचंद, संचालक डॉ. जी. व्ही. परिशवाड आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना राज्यमंत्री भामरे म्हणाले, की संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेमध्ये अभियंत्यांना खूप मोठी संधी आहे. सरकारने गेल्या काही वर्षात आपल्या धोरणांमध्ये व्यापक बदल केले आहेत. सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांची क्षमता, त्यांची गुणवत्ता यांचा वापर संरक्षण विकासाकरिता करण्यात येत आहे. देश-विदेशात अनेक मोठे अभियंते आणि अधिकारी या महाविद्यालयाने दिले आहेत. त्यामुळे संरक्षण संशोधन आणि विकास कार्यक्रमात या महाविद्यालयाच्या गुणवत्तेचा वापर करता आला, तर ती अभिमानाची गोष्ट ठरेल.

या वेळी बोलताना खासदार पाटील म्हणाले, की पदवी घेऊन महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी येथील उज्ज्वल परंपरा टिकवून ठेवावी. तुमच्या हातून समाजासाठी काही तरी चांगले कार्य घडत राहायला हवे. महाविद्यालयाने आजपर्यंत शिक्षणाची गुणवत्ता टिकवून ठेवली आहे. त्यामुळे याठिकाणी शिक्षण घेऊन बाहेर पडताना त्याचा निश्चितच मोठा लाभ विद्यार्थ्यांना होईल. या वेळी बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे, प्रशासकीय समितीचे अध्यक्ष अजित गुलाबचंद यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.


या पदवीदान सोहळ्यामध्ये बी. टेक पूर्ण केलेल्या ४३१ आणि एम. टेक पूर्ण केलेल्या २३३ विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवीदान सोहळ्यामध्ये संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खा. संजय पाटील, संचालक डॉ. जी. व्ही. परिशवाड आदी विद्यार्थ्यांस सन्मानित करीत असताना.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 MAY 2018
तरूण भारत

# डॉ. राजेंद्र खामकर सेट परीक्षा उत्तीर्ण



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रातील वरिष्ठ ग्रंथपाल डॉ. राजेंद्र खामकर ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातून सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या वतीने २८ जानेवारी २०१८ रोजी सेट परीक्षा घेण्यात आली होती. यापुर्वी ते नेट परीक्षा उत्तीर्ण झाले असून शिवाजी विद्यापीठात त्यांनी पीएच. डी. केली. पीएच. डी.च्या संशोधनासाठी त्यांना आयसीएसएसआर राष्ट्रीय फेलोशिप मिळाली होती. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधान पत्रिका व परिषदांमधून शोधनिबंध प्रसिध्द झाले आहेत.

लोकमत




## साहित्य भान

प्रा. रणधीर शिंदे

# सृजनाचं पहिलं पाऊल

मानवी जीवनात 'पहिलं पाऊल' विशेष महत्त्वाचे असते. सृष्टीनिर्मितीचा नवारंभ ते मानवी जगातल्या गोष्टींना अनेक अर्थांनी महत्त्व आहे. भुईतून अंकुर बाहेर पडणे, झाडाला फांदी फुटणे, फुलाचे उमलणे, पहिला उच्चार, पहिले अक्षर अशा अनेक गोष्टी या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतात. पहिल्या आविष्कारात अनेक गोष्टी दडलेल्या असतात. भविष्यातील घडणीचे भरणपोषण असते. त्यादृष्टीने लेखनातील पहिल्या उर्मींही अशाच आनंददायी, सुफळ असू शकतात. वि. स. खांडेकरांच्या वाङ्मयातील पहिल्या आविष्काराच्या वाटा जाणून घेणं तितकंच कुतूहलजनक आहे. खांडेकरांनी त्यांच्या वाङ्मयाच्या व घडणीच्या अनेक गोष्टी त्यांच्या 'पहिलं पाऊल' या आत्मपर लेखनात मांडल्या आहेत.

वि. स. खांडेकरांना लेखक म्हणून अफाट लोकप्रियता लाभली. ध्येयवादाचे आणि स्वप्नाकांक्षेची चित्रे त्यांनी रेखाटली. मध्यमवर्गीय ध्येयवादी स्वप्नसृष्टीचे जादूगार म्हणून त्यांना ख्याती लाभली. भारतीय भाषांमध्ये ते पसरले. अशा या लेखकाच्या एकंदर पहिल्या उर्मी सांगणारा 'पहिलं पाऊल' हा लेखसंग्रह आहे. त्यामध्ये खांडेकरांनी आपल्या आयुष्यभरातील कामगिरीच्या वाटा सांगितल्या आहेत. खांडेकरांचे लेखन, वाचन, संपादन व वक्तृत्वातील आरंभकाळातील आविष्कार रूपे सांगितली आहेत. लोकप्रिय ठरलेल्या लेखकाच्या लेखनाची स्वप्नभूमी घडविलेल्या काळाचे कथन त्यात आहे. वाङ्मयाकडे आकर्षित कसे झाले हे सांगत असताना त्यांनी पुंगीवाल्याची लोककथा दिली आहे. पुंगीच्या सुरांमागे जसे उंदीर जातात, तशा आंतरिक उर्मीतून ते वाङ्मयाकडे ओढले गेले.




सांगली, पुणे, शिरोडे व कोल्हापूर या स्थळावकाशाला खांडेकरांच्या घडवणुकीत महत्त्व आहे. बालपण सांगलीत गेले. सांगलीतील नाट्यावेडाने त्यांना वेगळ्या स्वप्नसृष्टीत नेले. वाङ्मयातील निर्मळ जगाच्या अस्पष्ट हाका या काळात त्यांना ऐकू येत होत्या. बालपणीच्या अनुभवाचा आयुष्यावर झालेल्या परिणाम प्रभावाच्या नोंदी त्यात आहेत. सामाजिक सुधारणा, पुराणमतवादाबद्दलचा अधिक्षेप, आगरकर व गडकऱ्यांच्या लेखनाने केलेला संस्कार महत्त्वाचा ठरला. लेखनकला चंद्राप्रमाणे मोहक; पण तिचे चांदणे जीवनाच्या सूर्याप्रमाणे अलगद पडल्याचे ते सांगतात. खांडेकरांच्या आदर्शवादी, ध्येयवादी, भावनाप्रधान विचारदृष्टीच्यादेखील खुणा त्यात आहेत. आईप्रमाणे लेखकाची मायाही आंधळी असते, असे ते म्हणतात. पुण्यात विद्यार्थिदशेत केशवसुतांची 'तुतारी' ही कविता वाचल्यानंतर त्यांना निरभ्र आकाशात वीज चमकल्याचे भासले. पहिले टीकालेखन, कथालेखन, लघुनिबंध, रूपककथा, नाटक, चित्रपट, पटकथा व वक्तृत्वातील मनोगत या लेखनात आहे. सुरवंटाचे फुलपाखरात रूपांतर होण्याच्या काळाचे तसेच खांडेकरांच्या लेखनक्रमातील स्थित्यंतर नोंदी आहेत. शिरोड्यातील चिमुकल्या खेड्यात राहताना 'गांधींच्या रुपानं तेज:पुंज तारा समाजमनाशी सुसंवाद साधत होता' असे त्यांनी म्हटले आहे.

कादंबरीकार म्हणून खांडेकरांचे वेगळे असे स्थान आहे. स्वत:च्या कादंबरी रुचीबद्दल खांडेकरांनी विस्तृतपणे माहिती दिली आहे. कृष्णाकाठची काळी कुळकुळीत वांगी, लुसलुशीत कणसे आणि अवतीभवतीची रसपूर्ण नाटके व भरमसाट वाचन यातून वाचनाचे स्रोत पसरविले. बालपणीच हरिभाऊ आपटे यांच्या ठिकाणी असणाऱ्या निराळ्या शक्तीची जाणीव झाली. ह. ना. आपटे यांच्या ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्यांनी मन उत्कंठीत आणि प्रज्वलित केल्याचे त्यांनी म्हटले आहे. 'मी त्यांच्या कादंबऱ्यांचा दोस्त झालो' असे म्हटले आहे. 'उष:काल' ही कादंबरी त्यांनी रात्रभर जागून वाचून काढली. पहिली कादंबरी लिहीत असताना 'आतल्या उमाळ्यापेक्षा बाह्य परिस्थितीच अधिक कारणीभूत' असल्याचे त्यांनी म्हटले आहे. कलाकृती ही नदीसारखी असते. तसेच लेखन आणि वाचन ही जुळी भावंडे आहेत, अशी वाक्ये या लेखनात ठिकठिकाणी आहेत. स्थळावकाश, वैचारिक, वाङ्मयीन जडणघडण, पहिले लेखनाविष्कार यांचा संबंध दर्शविणारे अतिशय प्रांजळ असे हे आत्मनिवेदनपर लेखन आहे. खांडेकर व्यक्ती आणि लेखक, तसेच त्या काळातील मराठी वाङ्मय समजून घ्यायलाही 'पहिली पावले' महत्त्वाची ठरतात. एका लेखकाच्या निर्मितीच्या या सृजनवाटा 'पहिलं पाऊल'मध्ये आहेत.